राज्यात सुरू करण्यात आलेल्या चारा छावण्यांमधील पशुधनाची दैनंदिन उपस्थिती नोंद करण्यासाठी संगणकीय प्रणालीचा वापर करणे तसेच पशुधनाच्या दैनंदिन आहारामध्ये वाढ करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: एससीवाय-२०१९/प्र.क्र. ३०/ म-७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार, मुंबई - ४००.०३२
दिनांक : ४ मे, २०१९.

संदर्भ :- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, समक्रमांक, दिनांक २५.०१.२०१९
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय,समक्रमांक, दिनांक १३.०२.२०१९
३) महसूल व वन विभाग, शासन पत्र, दिनांक ०८.०३.२०१९

प्रस्तावना

सन २०१८ च्या खरीप मोसमात राज्यातील बहुतांश जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान झालेले असल्याने राज्यातील २६ जिल्ह्यांमधील १५१ तालुक्यात, या १५१ तालुक्यांव्यतिरिक्त २६८महसुली मंडळांमध्ये दुष्काळ तसेच ५४४९ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित केलेली आहे.

२. राज्यात दुष्काळी परिस्थितीमुळे त्या भागातील पशुधनासाठी आवश्यक असणारा चारा व पाणी उपलब्धतेबाबतचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने, दुष्काळग्रस्त भागातील जनावरांना आवश्यक असलेल्या चाऱ्याच्या प्रश्नावर मात करण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील दुष्काळी भागात आवश्यकतेनुसार जनावरांना चारा व पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी जनावरांच्या छावण्या उघडण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन पत्रान्वये प्रति पशुधन अनुदानाचे दर सुधारित करण्यात आले आहेत व दुसरी चारा छावणी उघडण्यास मान्यता देण्यबाबत सुधारित निकष निश्चित करण्यात आले आहेत. चारा छावणी चालकांना प्रति पशुधनाच्या आधारे अनुदान देय असल्याने चारा छावण्यांमधील पशुधनाची दैनंदिन उपस्थितीची नोंद ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे. अशी नोंद ठेवण्यासाठी माहिती व तंत्रज्ञानावर आधारित

संगणकीय प्रणालीचा वापर अनिवार्य करण्याची बाब तसेच पशुधनांना दैनंदिन अनुज्ञेय करण्यात आलेल्या चाऱ्याच्या प्रमाणात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

चारा छावण्यांमधील पशुधनाची नोंदणी करून पशुधनाच्या संख्येची दैनंदिन नोंद ठेवण्यासाठी ॲन्ड्राईड मोबाईल (Android based Mobile) वर आधारित प्रणालीचा (Mobile Application) वापर चारा छावण्यांना अनिवार्य करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सदर प्रणालीचा वापर करण्यासंदर्भातील कार्यपध्दती व अंमलबजावणीबाबत पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत. त्यांचे पालन करण्यात यावे.

२. चारा छावण्यांमध्ये दाखल झालेल्या पशुधनाची नोंदणी करणे व तद्नंतर पशुधन संख्येची दैनंदिन नोंद ठेवण्यासाठी शौर्य टेक्नोसॉफ्ट प्रा.लि. (Shaurya Technosoft Pvt. Ltd.) या संस्थेने तयार केलेली प्रणाली (Cattle Camp Management System) विनाशुल्क उपलब्ध करून देण्यास संमती दिलेली आहे. चारा छावण्यांमधील व्यवस्थापनामध्ये या प्रणालीचा वापर करण्यासाठी सदर संस्थेस कोणतेही शुल्क देण्याची आवश्यकता नाही.

३. सदर प्रणाली (Cattle Camp Management System) राज्यात सध्या सुरू असलेल्या व नव्याने सुरू होणाऱ्या सर्व चारा छावण्यांमध्ये अनिवार्यपणे वापरण्यात यावी व या प्रणालीच्या माध्यमातून उपलब्ध होणारी पशुधन संख्येची नोंद छावणी चालकांना अनुदान देताना वापरण्यात यावी.

४. सदर प्रणालीचा (Cattle Camp Management System) वापर करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :

(१) चारा छावणीमध्ये दाखल झालेल्या व यापुढे दाखल होणाऱ्या पशुधनाची व त्यांच्या मालकांची नोंदणी प्रथमत: या प्रणालीमध्ये ॲन्ड्राईड मोबाईल (Android based Mobile) च्या आधारे करण्यात यावी.

(२) चारा छावणी चालकांनी त्यांच्या छावणीमध्ये दाखल झालेल्या पशुधनांच्या कानामध्ये बार कोड असलेले टॅग लावून घ्यावेत. यासाठी होणारा खर्च छावणी चालकांनी स्वत: करावा. अशा स्वरूपाचे बार कोड असलेले टॅग खुल्या बाजारात उपलब्ध होतील.

(३) संबंधित जिल्हाधिकारी यांनी शौर्य टेक्नोसॉफ्ट प्रा.लि या संस्थेशी संपर्क साधून बार कोड टॅगवरील नंबर दुबार वापरला जाणार नाही अशापध्दतीने टॅगवरील क्रमांक निश्चित करावेत (Unique Number).

(४) त्याचप्रमाणे प्रत्येक चारा छावणी चालकांनी त्यांच्याकडे अतिरिक्त टॅग देखील उपलब्ध ठेवावेत व नव्याने दाखल होणाऱ्या पशुधनांची नोंदणी करून त्यांच्या कानामध्ये बार कोडेड टॅग लावूनच प्रवेश देण्यात यावा.

(५) सदर बार कोडेड टॅग पशुधनांच्या कानामध्ये लावण्याची कार्यवाही पशुधन अधिकारी किंवा त्या विभागाचे प्रशिक्षित कर्मचारी यांचेमार्फत करण्यात यावी. बार कोडेड टॅग लावण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता भासल्यास छावणी चालकांनी त्याची व्यवस्था करावी.

(६) शौर्य टेक्नोसॉफ्ट प्रा.लि यांचेकडून सदर प्रणालीचा वापर करण्याबाबतचे एकदिवसीय प्रशिक्षण चारा छावणी चालकांचे पर्यवेक्षक/कर्मचारी तसेच महसुल विभागातील कर्मचारी यांना जिल्हास्तरावर देण्यात येईल. चारा छावणीच्या संचालनामध्ये दैनंदिन भूमिका पार पाडणारे छावणी चालकांचे पर्यवेक्षक/कर्मचारी तसेच महसुल विभागातील कर्मचारी यांना सदर प्रशिक्षण अनिवार्यपणे देण्यात यावे. अशा प्रशिक्षणाची व्यवस्था जिल्हाधिकारी यांनी वरील संस्थेशी संपर्क साधून तातडीने पूर्ण करावी. चारा छावण्यांची संख्या मोठी असल्यास असे प्रशिक्षण तुकडया (batches) पाडून पूर्ण करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करावी.

(७) प्रणालीच्या (Cattle Camp Management System) वापराचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर छावणी चालकांनी त्यांच्या छावणीमध्ये दाखल झालेल्या पशुधनांची व त्यांच्या मालकांची नोंद या संगणकीय प्रणाली मध्ये करावी. तसेच नवीन दाखल होणाऱ्या पशुधनांना प्रवेश देतेवेळीच त्यांची नोंद संगणक प्रणाली मध्ये करण्यात यावी.

(८) या प्रणालीचा वापर करण्यासाठी चारा छावणी चालकाकडे/ छावणी संचलन करणाऱ्या कर्मचाऱ्याकडे अन्ड्राईड बेस्ड मोबाईल (Android based Mobile) असणे आवश्यक आहे. तसेच त्या मोबाईलवर ईंटरनेट सुविधा असणेही आवश्यक आहे.

(९) छावणीतील पशुधनाची दैनंदिन संख्या मोजण्यासाठी मोबाईलवरील अप्लीकेशनचा (Mobile App) वापर करून प्रत्येक पशुधनाच्या कानातील टॅगवरील बारकोड स्कॅन करण्यात यावा. ही कार्यवाही दिवसातून एकदा नियमितपणे करावी. जेणेकरून पशुधनाची दैनंदिन नोंद होईल.

(१०) एखादया छावणीमध्ये पशुधनाची संख्या जास्त असल्यास बारकोड स्कॅन करण्यासाठी छावणी चालकांनी एकापेक्षा अधिक मनुष्यबळ व अन्ड्राईड बेस्ड मोबाईलची व्यवस्था

करावी. परंतु छावणीतील सर्व पशुधनाची दैनंदिन नोंदणी या प्रणालीमार्फतच होईल याची खबरदारी घ्यावी.

(११) या प्रणालीच्या वापरामुळे जिल्हयात सुरू असलेल्या प्रत्येक चारा छावणीमधील पशुधनाची दैनंदिन संख्या जिल्हाधिकारी/तहसिलदार यांना www.charachavani.com या संकेत स्थळावर उपलब्ध होईल. यासाठी संबंधित जिल्हाधिकारी व तहसिलदार यांना स्वतंत्र युजर नेम व पासवर्ड देण्यात येईल. सदर युजर नेम व पासवर्ड देण्याची जबाबदारी शौर्य टेक्नोसॉफ्ट प्रा.लि यांची राहील.

(१२) चारा छावणी चालकांना अनुदान प्रदान करताना या प्रणालीमार्फत निर्माण होणाऱ्या पशुधनाच्या दैनंदिन नोंदीचा व त्यानुसार तयार होणाऱ्या अहवालांचा वापर करण्यात यावा.

(१३) प्रणालीचे प्रशिक्षण, चारा छावणीतील पशुधनाची नोंदणी व पशुधनाची दैनंदिन नोंद घेण्यास सुरूवात करणे अशी संपूर्ण कार्यवाही दिनांक १५ मे, २०१९ पर्यंत पूर्ण करून त्यानंतर या प्रणालीचा वापर अनिवार्यपणे सुरू करण्यात यावा.

(१४) ही प्रणाली राज्यातील चारा छावण्यांसाठी विनाशुल्क पुरविणाऱ्या शौर्य टेक्नोसॉफ्ट प्रा.लि. यांचेशी पुढील क्रमांक व ई मेल वर संपर्क साधण्यात यावा :

संपर्क अधिकारी – **श्री संदीप जगदाळे**
दूरध्वनी क्रमांक – **०२०- २४२६१३४४, मोबाईल क्रमांक – ७७१९०४११४४**
ई मेल आयडी – shauryatechnosoftpune@gmail.com

५. छावणीत दाखल झालेल्या मोठया व लहान पशुधनास प्रतिदिन दयावयाच्या चाऱ्याचे प्रमाण संदर्भाधीन क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहे. चारा छावणी चालकांना देय असलेल्या प्रति पशुधनाच्या अनुदानामध्ये दिनांक १.४.२०१९ पासून रू ९०/- प्रति मोठे जनावर प्रतिदिन व रू ४५/- प्रति लहान जनावर प्रतिदिन अशी वाढ करण्यात आलेली आहे. दुष्काळी परिस्थिती विचारात घेता दैनंदिन पोषण व्यवस्थित होवून चारा छावण्यांमध्ये दाखल होणाऱ्या पशुधनांची रोग प्रतिकारक शक्ती आणि उत्पादन क्षमता कायम राहण्याकरिता त्यांना योग्य आहार देणे गरजेचे असल्याने हे प्रमाण खालील प्रमाणे सुधारित करण्यात येत आहे. सुधारित प्रमाणानुसार चारा देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

चाऱ्याचा प्रकार	मोठे जनावरे		लहान जनावरे	
	पुर्वीचे प्रमाण	सुधारित प्रमाण	पुर्वीचे प्रमाण	सुधारित प्रमाण
हिरवा चारा, ऊसाचे वाडे, ऊस	१५ कि.ग्रॅ.	१८ कि.ग्रॅ	७.५ कि.ग्रॅ.	९ कि.ग्रॅ.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१९०५०६१०५४५७४११९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.05.06 11:01:00 +05'30'

(सु .ह.उमराणीकर)
उपसचिव, महसूल व वन विभाग

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य
३. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (पदुम), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. विभागीय आयुक्त (सर्व)
८. जिल्हाधिकारी (सर्व)
९. मा.मंत्री (मदत व पूनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०.मा. राज्यमंत्री (मदत व पूनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. मा.मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२. मा.राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व)
१४. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
१५. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
१६. संचालक, शौर्य टेक्नोसॉफ्ट प्रा. लि. ६९४/१/२/४, आदर्श नगर, सहकार भवन, सातारा रोड, पुणे - ४११०३७
१७. निवड नस्ती, म-७